महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/**१०१६८**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - ६९४२५१४१
दिनांक : **०१.०४.२०२४**

# परिपत्रक

**विषय :** सन-२०२४ या वर्षाकरिता एम्प्लॉई पोर्टलव्दारे विनंती बदली अर्ज सादर करण्याच्या तसेच विनंती अर्ज रद्द करण्याच्या तारखेत मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** : प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४.

*****

महावितरण कंपनीमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्वसाधारण बदलीबाबतचे धोरण राबविण्यात येत असून वेळोवेळी सदर धोरणात सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. या धोरणाअंतर्गत इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांना एम्प्लॉई पोर्टलद्वारे विनंती बदलीसाठी अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विनंती बदली प्रक्रियेमध्ये अचूकता व सुटसुटीतपणा आणण्याच्या दृष्टीकोनातून प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४ अन्वये नव्याने रचना करण्यात आलेल्या विनंती बदली अर्ज एम्प्लॉई पोर्टलद्वारे सादर करण्याबाबतच्या सविस्तर सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

२. यानुसार कर्मचाऱ्यांनी यापूर्वी एम्प्लॉई पोर्टलव्दारे सादर केलेले विनंती बदली अर्ज रद्द करण्यात आले असून सन-२०२४ व त्यापुढील वर्षाकरिता विनंती बदलीस इच्छुक कर्मचाऱ्यांनी दरवर्षी नव्याने विनंती बदली अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संदर्भीय प्रशासकीय परिपत्रकानुसार अर्ज सादर करण्याकरिता अंतिम तारीख दरवर्षी ३१ मार्च अशी विहित करण्यात आली असून सादर करण्यात आलेला विनंती अर्ज रद्द करण्याची अंतिम तारीख दरवर्षी १५ एप्रिल अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

३. एम्प्लॉई पोर्टलव्दारे नव्याने विकसित केलेला विनंती अर्ज भरतांना येणाऱ्या अडचणी आणि जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांना विनंती अर्ज सादर करता यावा याकरिता फक्त २०२४ या बदली वर्षाकरिता विनंती अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **१५ एप्रिल** व विनंती बदली अर्ज रद्द करण्याची अंतिम तारीख **३० एप्रिल** पर्यंत वाढविण्यात येत आहे. प्रशासकीय परिपत्रक क्र.६६७ दि.१३.०३.२०२४ मधील इतर तरतुदींत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या E-library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(भूषण कुलकर्णी)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/(मासं)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(देयके व वसूली)/(वितरण)/(वित्त व लेखा) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी अधिकारी/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
५) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/(मासं-मासंव्यप्र)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.